## दिनांक 07/04/2025

**1.** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 5/04/2025 रोजी 22:30 वा च्या सुमारास मौजे इदापूर, माणगांव येथे फिर्यादी यांच्या ताब्यातील पिकअप टेम्पो गाडी क्र -एम ऐच 06 बी ब्ल्यु 8830 या गाडी वरील चालक हे गाडी घेवुन तळा ते शेगाव येथे सोयाबीनचा बुसा घेवुन(गुरंाचे खादय) आणने करीता जात असताना मौजे इदापूर येथे आलेवेळी इंदापूर येथील अनोळखी आरोपी यांनी गुरे घेवुन जात असल्याच्या संशयावरुन गाडी थांबवुन फिर्यादी तसेच जखमी चालक यांना मारहान करीत असताना मौजे तळा येथील राहणारे वरील आरोपी हे तेथे आले व त्यांनी सुध्दा फिर्यादी व चालक यांला हाताबुक्याने मारहान करुन चालक याला नाकाला गंभीर दुखापत केली. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र 01 ते 04 दिनांक व वेळ 06/04/2025 रोजी 16:21 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं.76/2025, भारतीय न्याय संहिता कलम 117(1), 117(4),115(2),126(2),351(2),189(1),189(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/नरेंद्र बेलदार, हे करीत आहेत.

**2.** रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 05/04/2025 रोजी 15:30 वा ते दि. 06/04/2025 रोजी 15:30 वा च्या दरम्यान मौजे शिवनेरी सोसायटी, दुसरा माळा, रूम नं.12 एम.आय. डी.सी.कॉलनी, मोहपाडा ता.खालापुर येथे कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे बंद घराच्या दरवाजाचे कुलूप कोयडा तोडून आत प्रवेश करुन घरातील लोंखडी कपाटाचे लॉकर तोडून एकूण 2,50,000/- रुपये व किमतीचे सोन्याचे दागिने फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे इरादयाने चोरून नेले.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.78/2025, bns 2023 चे कलम 331(3), 331(4), 305,303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/ माळी, हे करीत आहेत.

**3.** पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 27/12/2024 रोजी 00:00 वा ते दि. 06/04/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान आरोपीत याने महिला फिर्यादी यांच्याशी प्रेम संबंध निर्माण करुन त्यांचे सोबत फोटो काढुन फिर्यादीस ते फोटो वायरल करण्याची धमकी देवुन पैशाची मागणी करुन आरोपीत याने त्याचे फेसबुक आयडी वरुन फिर्यादी सोबत काढलेले फोटो व्हायरल करुन त्यांची बदनामी करुन फिर्यादीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.65/2025, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 (2008 चे सुधारणेसह) 66E, ,भा.न्या.सं.2023 चे कलम 78(2), 351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोनि/संदीप बागुल, हे करीत आहेत.

**4.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 06/04/2025 रोजी 14:30 वा च्या सुमारास मौजे नावंढे ता खालापुर गाव हददीत फिर्यादी रा. नावंढे ता खालापुर यांचे घरामध्ये व घराचे समोरील अंगणामध्ये आरोपी रा. नावंढे ता खालापुर यानी संगणमत करुन गैरकायदयाची मंडळी जमवुन यांचे राहते घरामध्ये शिवीगाळी दमदाटी करीत घसुन फिर्यादी यांना शिवीगाळी करुन आरोपी नं 02 याने फिर्यादी यांचे अंगावर चॉपर मारला तो त्यानी चुकवीला असता तो त्यांचे वडीलांचे डोक्यास लागला तसेच आरोपी नं 01 याने फिर्यादी यांचे कमरेच्या पटटयाने मारहाण केली तसेच आरोपी नं 03 व 05 याने हातातील लाकडी टिप याने फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण केली तसेच सोबत आलेल्या इतर आरोपी नं 3 व 5 ते7 यानी दगडी तसेच चप्पलांनी फिर्यादी यांना मारहाण केली. तसेच त्यांना सोडविण्याकरीता आलेला साक्षीदार यांस आरोपी यांनी दांडक्यांनी व हाताबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळी केली तसेच त्याची पल्सर मोटार सायकलवर उपटी टाकुन फोडुन नुकसान केले. तसेच साक्षीदार हा मोबाईलमध्ये घटनेची शुटींग करीत असल्याचे पाहुन आरोपी नं 3 याने त्याचे अंगावर दगड फेकुन मारुन शिवीगाळी केली फिर्यादी व साक्षीदार यांना दुखापती केल्या.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.118/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 115(2), 118(1), 333, 352,351(2),324 189 (2),(4),191(2),(3 ), 190 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/कांबळे, हे करीत आहेत.

**5.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 06/04/2025 रोजी 13:00 वा च्या सुमारास मौजे नावंढे ता खालापुर गाव हददीत केळवली रेल्वे स्टेशन जवळील रोडवर आरोपीचे घराचे मोकळया जागेत येथे आरोपी यानी आपसात संगणमत करुन केळवली रेल्वे स्टेशन जवळील रोडवर कार मध्ये बसलेले असताना तेथुन जाणारे फिर्यादी यांना पाहुन शिवीगाळी केली व तेथुन निघुन गेले त्याबाबत फिर्यादी व साक्षीदार हे आरोपी याचे घरी विचारणा करणेकरीता गेले असता आरोपी क्र 01 याने फिर्यादी याचा भाउ साक्षीदार यांना ए लंगडया तुझे दोन्ही पाय मोडीन असे बोलुन त्याचे हातावर चौकोणी रॉडचा फटका मारला तसेच आरोपी क्र 1 याने त्याच्या कंबरेला असलेल्या चॉपरने फिर्यादी याच्या उजव्या हाताच्या मनगटावर व छातीवर वार केला त्यावेळी आरोपी क्र 02 याने फिर्यादी यांची मान पकडली व आरोपी क्र.3 याने साक्षीदार यास हाताबुक्क्यांनी मारहाण करुन फिर्यादी व भाऊ व आई हिस दुखापती केल्या.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.119/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 118(1), 115(2), 352,351(2),3 (5 )प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/कांबळे, हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 06.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 257 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 3,01,250/-रुपये इतका दंड आकारला आहे.